# बजाज इलेक्ट्रिकल्स लिमिटेडची नागपूरमधील दैदिप्यमान कामगिरी

नागपूर : भारतातील अग्रगण्य कन्झ्युमर ड्युरेबल उत्पादने आणि लाइटिंग कंपनी असलेल्या बजाज इलेक्ट्रिकल्स लिमिटेडने २०१३-१४ वर्षामध्ये आपल्या ७५ व्या वर्षात पदार्पण केले आहे आपल्या हिरक महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने कंपनीने प्रत्येक शाखेतील डीलरशी संवाद साधला आणि येत्या वर्षामध्ये सह्य व्यवसाय संबंध अधिक दृढ व्हावे या दृष्टीने बनवण्यात आलेल्या योजना त्यांच्यासमोर मांडल्या. श्री पीएस टंडन, कार्यकारी संचालक कन्झ्युमर प्रोडक्स म्हणाले कंपनीला नागपूर बाजारपेठेमध्ये नेहमीच नवनवीन संधीचा लाभ झालेला आहे आम्ही इथे आमच्या जाळ्याचा विस्तार करतच राहणार आहोत आणि नवनवीन व जागतिक दर्जाची उत्पादने दाखल करत राहणार आहोत बजाज इलेक्ट्रिकल्स लिमिटेड सोबत व्यवसाय वृद्धिंगत होऊन आमच्या भागीदारांचे भवितव्य उज्वल व्हावे अशी मनोकामना आम्ही या निमित्ताने करत आहोत आणि एकत्र मिळून आपण पुढील प्रवास अत्यंत यशस्वीपणे पार पाडू शकू ह्याची आम्हाला खात्री आहे. आणि या शाखेची कामगिरी खरोखरीच दिमाखदार म्हणावी अशी आहे या शाखेने नोव्हेंबर २०१३ पर्यंत ११ टक्के इतक्या सीएजीआरने आणि १८ टक्के इतक्या वाढीच्या दरासह ३५.६२ कोटी रूपयांच्या विक्रीची नोंद केली आहे. इतकेच नव्हे तर बी २ सी या व्यवसायात एलइडी दिव्यांपासून ते बहुकार्यक्षम ओटीजीपर्यंत अनेक नवनवीन उत्पादनेही दाखल केली आहेत कंपनीने नागपूर बेतुल राष्ट्रीय महामार्ग रस्ता प्रकल्प आणि एनटीपीसी मौदाचे हाय मास्ट स्ट्रीट लाइटिंग वरोरा बल्लारशाह राज्य महामार्ग प्रकल्पाकरिता आक्टागॉनल पोल्स नागपूरमध्ये शून्य मैलावर हायमास्टरचे इन्स्टालेशन नागपूर महानगरपालिकेकरिता हायमास्ट नागपूर रेल्वे स्टेशनमध्ये सीआय पोल्स हे नवे उत्पादन वापरणे असे अनेक प्रतिष्ठीत प्रकल्प हाती घेतलेले आहेत कंपनीला नुकताच कस्तुरबा गांधी वैद्यकीय महाविद्यालय अदनी पावर तिरोडा, एमएनसी उमरेड एमएनसी धुळे विश्वराज इन्फ्रास्ट्रक्चर यांच्याकडून नव्या आर्डर्स मिळाल्या आहेत समाजाचे कल्याण व्हावे अशा पद्धतीने संघटनात्मक संस्कृती विकसण्याच्या उद्देशाने या शाखेने एका रक्तदान मोहिमेचे टाकाऊ कचरा व्यवस्थापन मोहिमेचे वृक्षारोपण मोहिमेचे आयोजन केले होते आणि आपल्या राष्ट्रस्तरीय पुढाकाराचा एक भाग म्हणून ती तंबाखूविरोधी लढाई सुरू ठेवली आहे. बजाज इलेक्ट्रिकल्स लिमिटेड ही ७५ वर्षे जुनी आणि अत्यंत विश्वासार्ह कंपनी असून तिची उलाढाल ३३८७.५७ कोटी रूपये इतकी नोंदवण्यात आली असल्याची माहिती आहे.